REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २३ आगस्ट, १९५०. अंक ३४


## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )
स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यायत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—
शेड्यूल्ड बँक
( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर, मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१८,२६५
खेळतें भांडवल रु. ७१,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

दळणाच्या चक्क्यां–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**डॉलर्स मिळविणारें मँगेनीज**—१९५० सालीं भारत ७ लाख टन मँगेनीज निर्यात करणार आहे असें समजतें. ह्या निर्यातीपैकीं ५,००,००० टन अमेरिका घेणार आहे. गेल्या वर्षी भारतानें सुमारें ६,००,००० टन मँगनिज निर्यात केलें. निर्यातीवरील जकातीमुळें भारत सरकारला ७०,७५,०९७ रुपये उत्पन्न झालें. शस्त्रास्त्राला लागणारें पोलाद निर्माण करण्यासाठी ह्या खनिजाची फार जरूर असते, कारण मँगेनीज ऐवजीं दुसरी खनिज धातू वापरून चालत नाहीं.

**वनस्पतींचें संशोधन**—नॉर्वेमधील कांहीं गिर्यारोहणपटु पाकिस्तानमधील अत्युच्च पर्वत–शिखर जें तिरिमगीर ह्यावर जाऊन आले. येतांना त्यांनीं आपल्याबरोबर निरनिराळया प्रकारच्या ४०० वनस्पतींचे नमुने आणले आहेत. ह्या वनस्पतींसंबंधीं संशोधन करण्यासाठीं त्या मुद्दाम नॉर्वेला नेण्यांत येणार आहेत.

**कोऑपरेटिव्ह बँकेंत सरकारचें भांडवल**—यू. पी. कोऑपरेटिव्ह बँकेच्या वसूल भांडवलाइतकें, परंतु ५० लाख रुपयांपेक्षा अधिक नाहीं, इतकें भांडवल संयुक्त–प्रांत सरकार वरील बँकेंत गुंतविण्याचा विचार करीत आहे. ही सूचना प्रांताच्या विधिमंडळाच्या स्टँडिंग कमिटीनें मान्य केल्यास सरकारला आपल्या भांडवलावर इतर भागीदारांप्रमाणेंच नफा मिळेल. ह्या संबंधीं अशी एक सूचना करण्यांत आली आहे, कीं तीन टक्क्यांपेक्षां अधिक नफा मिळाल्यास जादा नफ्यांतून एक फंड उभारण्यांत यावा आणि त्याचा उपयोग सहकारी संस्थांना मदत करण्यासाठी करण्यांत यावा. ह्याशिवाय सरकारनें बँकेला २५ लाख रुपयांचें कर्ज द्यावें, म्हणजे बँकेला जिल्हा सहकारी बँकांचे भाग घेतां येतील, अशीही सूचना करण्यांत आली आहे.

**चित्रपटांची वाढती भूक**—'पायोनिअर' ह्या चित्रपटविषयक नियतकालिकाचे संपादक श्री. घोष ह्यांची फिल्म इन्कायरी कमिटीपुढें साक्ष झाली. श्री. घोष म्हणाले कीं, भारतांतील जनतेची चित्रपट पहाण्याची भूक फार मोठी आहे. सध्यां भारतांतील ४० कोटी लोकसंख्येला अवघि २,००० चित्रपटगृहें आहेत. भारतांतील चित्रपटाच्या दर्जाकडे मात्र मुळींच लक्ष देण्यांत येत नाहीं.

**हेन्री वॉलेस ह्यांचा राजीनामा**—अमेरिकन प्रोग्रेसिव्ह पक्षाचे संस्थापक मि. हेन्री वॉलेस यांनीं पक्षाचा राजीनामा दिला आहे. १९४८ सालीं झालेल्या अमेरिकेच्या अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळीं ह्याच पक्षातर्फे अध्यक्षपदासाठी ते उभे राहिले होते. कोरियांत चाललेल्या युद्धासंबंधीं पक्षानें कम्युनिस्टांचें धोरण स्वीकारल्यामुळें त्यांनीं पक्षाशीं संबंध तोडला. कोरियन युद्धासंबंधीं अमेरिकेच्या धोरणास त्यांचा पाठिंबा आहे.

**भारत व चीन ह्यांचा व्यापार**—कलकत्त्याहून 'टाकसंग' नांवाची बोट २,००० टन तागाचा माल घेऊन टिनस्टिनला जाणार आहे. भारताहून कम्युनिस्ट चीनला जाणारी ही पहिलीच बोट आहे असें समजतें.

**२५,००० गुरांचा नाश**—नाशिक जिल्ह्यांतील डांग विभागांत चालू पावसाळ्यांत सबंध वर्षाचा पाऊस एका महिन्यांत पडला. चराऊ रानें पावसाच्या पाण्यांत बुडून गेलीं, गोठे पडले आणि रोगराई उत्पन्न झाली. ह्या ओल्या अरिष्टामुळें डांग भागांतील २५,००० गुरें नष्ट झालीं असावीं असा अंदाज आहे.

**गवत कापण्याची स्पर्धा**—स्पेनमध्यें कोयत्यानें गवत कापण्याची स्पर्धा नुकतीच झाली. ह्या स्पर्धेत पहिल्या आलेल्या शेतकऱ्यानें एका तासांत ३ टन व ७६३ पौंड गवत कापलें असें समजतें. दुसऱ्या नंबरानें २ टन व १९४९ पौंड गवत कापलें. ही स्पर्धा पहाणाऱ्या प्रेक्षकांनीं निकालाबद्दल आपसांत पैजा मारल्या होत्या.

**वाघाच्या बच्चांची किंमत किती?**—लंडनमधील एका खाजगी प्राणिसंग्रहालयासाठी बंगाली वाघाचे दोन बच्चे विमानानें पाठविण्यांत आले. हीं दोन पिलें जंगलांतून नुकतीच आणण्यांत आलीं होतीं. तीं सहा महिन्यांचीं होतीं. दोन पिलांची किंमत ६०० पौंड म्हणजे जवळ जवळ ८,००० रुपये झाली.

**आयुर्वेदीय संस्थेसाठीं देणगी**—बंगलोर येथील एका धनाढ्य व्यापाऱ्यानें शहरांतील आयुर्वेदीय संस्थेला १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. देणगी म्हैसूर संस्थानच्या सरकारच्या हवालीं करण्यांत आली असून तिचा विनियोग आयुर्वेदाचें शिक्षण देणारी एक संस्था काढण्यासाठी करण्यांत यावयाचा आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचें उत्पन्न**—लुधिआना जिल्हा बोर्डानें आपल्या हद्दींत सायकलींवर कर बसविण्याचें ठरविलें आहे. ह्या करापासून बोर्डाला ८,००० रुपये उत्पन्न झालें असून त्यांत आणखीही भर पडेल असा अंदाज आहे. सायकलींवरील कर हा आतां स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाच्या कायमच्या बाबींत जाऊन बसला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**जगांतील रबराचें उत्पादन**—गेल्या जून महिन्यांत जगांत १,५७,००० टन रबराचें उत्पादन झालें. एका महिन्यांत झालेल्या उत्पादनाचा हा उच्चांक आहे. रबराच्या ह्या महिन्यांतील खपापेक्षा हा आंकडा २०,००० टनांनीं अधिक आहे. कृत्रिम रबराचें उत्पादन ४३,५०० टन झालें. १९४९ च्या पहिल्या सहा महिन्यापेक्षां १९५० मधील पहिल्या सहा महिन्यांत रबराचें उत्पादन १७.९ टक्क्यांनीं वाढलें. १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत ७,९२,५०० टन नैसर्गिक रबराचा उपयोग करण्यांत आला.

**डालर्स मिळविणारीं माकडें**—१ जानेवारी १९५० पासून भारतानें १२,००२ माकडें परदेशांना निर्यात केलीं. त्यापैकीं ११,६०३ माकडे अमेरिकेनें घेतलीं. इंग्लंडनें ६८५, इटालीनें ३७५, हॉलंडनें १८६, डेनमार्कनें १४४, प. पाकिस्ताननें ६ आणि अर्जेंटायनानें ३ अशीं माकडें विकत घेतलीं. अमेरिकेला माकडें पाठविण्यानें भारताला दुर्लभ अशी डॉलर्सची हुंडणावळ मिळते.

**मध्यप्रदेशांतील सहकारी संस्था**—मध्य प्रदेशांतील सहकारी संस्थांनीं २० कोटी रुपयांची व्यापारी उलाढाल केली असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २३ आगस्ट, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांच्या नोकरांचे पगार व भत्ते

### निवाडा प्रसिद्ध झाला

ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल (बँक डिस्प्यूट्स) चा निवाडा भारत सरकारनें नुकताच प्रसिद्ध केला. सुमारें २०० बँकांवर ह्या निवाड्याचा परिणाम होणार असून, त्यांत पगाराचें मान, महागाईभत्ता, बोनस, बढतर्फी, इत्यादि प्रश्नांचा विचार करण्यांत आला आहे. ह्या निवाड्यावर अपील करण्याची सवड इं. डि. (ॲ. ट्रा.) ॲक्ट १९५० च्या ७ (२) कलमानें ठेवलेली नाहीं.

निवाड्यानें बँकांच्या दर्जाची खालीलप्रमाणें वर्गवारी केली आहे.

(अ) २५ कोटी रुपयांचे वर खेळतें भांडवल असलेल्या.
(ब) ७½ ते २५ कोटी रुपयांच्या खेळत्या भांडवलाच्या.
(क) इतर बँका

रहाणीच्या मानाप्रमाणेंहि बँकांची वर्गवारी करण्यांत आली आहे. पहिल्या वर्गांत मुंबई, दिल्ली, कलकत्ता व अहमदाबाद हीं शहरें आहेत. पंजाबमधील ५० हजारावरील वस्तीचीं व इतर ठिकाणची १ लाखावरील वस्तीचीं गांवें दुसऱ्या वर्गांत घालण्यांत आलीं असून इतर शहरें तिसऱ्या वर्गांत समाविष्ट आहेत.

कारकुनांचा किमान पगार खालीलप्रमाणें ठरविण्यांत आला आहे:–

| बँकेचा दर्जा | रहाणीचें मान | किमान पगार रु. |
|---|---|---|
| अ | पहिला वर्ग | ९६ |
| | दुसरा वर्ग | ८२ |
| | तिसरा वर्ग | ७० |
| ब | पहिला वर्ग | ९२ |
| | दुसरा वर्ग | ७८ |
| | तिसरा वर्ग | ६६ |
| क | पहिला वर्ग | ८६ |
| | दुसरा वर्ग | ७३ |
| | तिसरा वर्ग | ६२ |

१९४४ सालांतील रहाणीच्या मानावर वरील पगार आधारलेले आहेत. इंडेक्स नंबर १० नें वाढला कीं, प्रत्येक वेळीं त्या प्रमाणांत महागाईभत्ता वाढविला जाईल.

| पगार रु. | महागाई भत्ता (इंडेक्स नंबरांतील प्रत्येक १० पॉईंटला) |
|---|---|
| ५० | ९ ३/८% |
| १०० | ८ १/२% |
| १५० | ७ १/२% |
| २०० | ६ १/२% |
| २०० वरती | ५% |

कांहीं विशिष्ट प्रकारचे नोकर, पदवीधर, बँकिंग डिप्लोमावाले, हेड क्लार्क्स, सुपरवायझर्स, इत्यादींना पगाराखेरीज खास अलावन्सहि मिळावयाचा आहे. अ दर्जाच्या बँकांच्या कलकत्ता, मुंबई, अहमदाबाद, दिल्ली व कानपूर येथील नोकरांना घरभाड्याचा अलावन्स मिळावयाचा आहे.

पगाराच्या व भत्त्याच्या श्रेणी अ दर्जाच्या बँकांवर निवाड्याच्या प्रसिद्धीच्या तारखेच्या आधीं सहा महिन्यांपासून बंधनकारक होणार आहेत. ब दर्जाच्या बँकांस निवाड्याच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून निवाडा बंधनकारक होईल. बाकीच्या म्हणजे क दर्जाच्या बँकांना प्रसिद्धीच्या तारखेनंतर सहा महिने मुदत मिळणार आहे. त्यानंतर निवाडा त्यांस लागू होईल.

मध्यवर्ती सरकारच्या नोकरवर्गास रजेचे जे नियम लागू आहेत त्याच धर्तीवर बँकांच्या नोकरांसाठी नियम केलेले आहेत. त्यांना बोनस खालीलप्रमाणें मिळेल:–

| | |
|---|---|
| ४% डिव्हिडंडपर्यंत | बोनस नाहीं |
| त्यावरील प्रत्येक १/४% डिव्हिडंडला | १/४ महिन्याचा पगार |

जेथें प्रॉव्हिडंट फंड चालू नाहीं, तेथें तो सहा महिन्यांत सुरू केला पाहिजे. भारत सरकारच्या फंडाचे नमुन्याचे नियम बँकांनीं स्वीकारले पाहिजेत. (१) नोकरीवर असतांना नोकर मृत्यु पावला, (२) शारीरिक अगर मानसिक व्याधीमुळें नोकर काम करूं शकत नसला किंवा दहा वर्षांच्या नोकरीनंतर बँकेनें त्यास कामावरून कमी केलें, अथवा (३) १५ वर्षांच्या नोकरीनंतर स्वखुषीनें नोकर निवृत्त झाला किंवा त्यानें राजिनामा दिला, तर कोणत्या प्रकारें त्यास ग्रॅच्युइटी द्यावी हेंहि निवाड्यानें सांगितलें आहे. नोकरांना वैद्यकीय मदत देणें व तिचा कांहीं विशिष्ट खर्च सोसणें बँकांवर बंधनकारक होणार आहे.

ट्रायब्यूनलच्या निवाड्याची चर्चा आतां प्रत्येक बँकेच्या व्यवस्थापक व नोकर वर्गांत चालू आहे, परंतु निवाड्याच्या प्रसिद्ध झालेल्या गोषवाऱ्यावरून त्याची पुरी कल्पना येऊं शकत नसल्यामुळें अद्याप त्यावर मतप्रदर्शन झालेलें नाहीं. निवाड्याप्रमाणें, बँकेच्या कारकुनाचा किमान पगार ६२ रु. रहाणार आहे, आणि त्यांत महागाई व इतर भत्ते हे मिळविले जातील. १९४४ सालच्या रहाणीचा खर्च १०० धरला, तर तो आतां सुमारें १५० झाला आहे. ह्या हिशेबानें महागाईभत्त्याची रक्कम किती होईल हें दिलेल्या तक्त्यावरून काढतां येईल. उदाहरणार्थ, १०० रुपये पगाराच्या नोकरास ४२ रु. ८ आ. महागाई भत्ता मिळेल. निवाड्यांतील अटींमुळें बँकांचा व्यवस्था खर्च तीस टक्के वाढेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. लहान बँकांना हा जादा खर्च परवडणार नाहीं, हें उघड आहे. निवाड्याविरुद्ध अपील करण्यास वाव नसल्याकारणानें, त्यामुळें वाढणाऱ्या खर्चाची व्यवस्था करणें बँकांना क्रमप्राप्तच आहे.

## बँकिंग ट्रायब्यूनलचा निवाडा: कांहीं तपशील

### इंडेक्स नंबरचें रूपांतर

मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, जळगांव, नागपूर इत्यादि शहरांतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाच्या मानाचे इंडेक्स नंबर्स प्रसिद्ध होतात, त्यांचें मूळ वर्ष १९३९ आहे; १९४४ नाहीं. ह्या इंडेक्स नंबर्सचें रूपांतर १९४४ = १०० करून घ्यावें लागेल. तें असें करावें :—

| | | |
|---|---|---|
| मुंबई | $\frac{१००}{२२८}$ = | ·४४ |
| अहमदाबाद | $\frac{१००}{२९४}$ | ·३४ |
| सोलापूर | $\frac{१००}{२७८}$ = | ·३६ |
| जळगांव | $\frac{१००}{३१५}$ = | ·३२ |
| नागपुर | $\frac{१००}{२०७}$ = | ·४८ |

वर दिलेल्या आंकड्यांनीं ( उदाहरणार्थ मुंबईच्या बाबतींत $\frac{१००}{२२८}$ म्हणजे ·४४ ) १९३९=१०० च्या इंडेक्स नंबरला गुणून १९४४=१०० चा इंडेक्स नंबर तयार करावा. मुंबईचा १९३९=१०० ह्या प्रमाणें तयार केलला मार्च १९५० मधील इंडेक्स नंबर २८८ होता आणि सोलापूरमधील ४०८ होता. त्यांचें रूपांतर २८८×·४४=१२७ व ४०८×·३६ =१४७ असें होईल. म्हणजे इंडेक्समधील वाढ अनुक्रमें २७ व ४७ अशी आहे.

### बिगर-कारकुनांना पगार किती मिळेल ?

निवाड्याचा सारांश प्रसिद्ध झाला, त्यांत कारकुनांच्या पगाराचाच तपशील आहे. पट्टेवाले, वगैरेंच्या पगाराचे आंकडे खालीं दिले आहेत.

| बँकेची वर्गवारी | अ दर्जाची बँक | ब दर्जाची बँक | क दर्जाची बँक |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| १ मुंबई, दिल्ली, कलकत्ता, इ. | ६० | ५६ | ५२ |
| २ पंजाबांतील ५० हजार वस्तीचीं व इतर ठिकाणीं १ लाख वस्तीचीं गांवें. | ४९ | ४६ | ४३ |
| ३ बाकीचीं गांवें | ४० | ३८ | ३५ |

### त्यांची पगारवाढ किती होईल ?

| नोकरीचीं वर्षे | बँकेची वर्गवारी | अ दर्जा | ब दर्जा | क दर्जा |
|---|---|---|---|---|
| २–१५ | १,२ व ३ | १ रु. | १ रु. ८ आ. | |
| १६–२५ | १,२ व ३ | १ रु. ८आ. | १ रु. ८आ. | १ रु |

### वैद्यकीय मदत किती मिळेल

प्रत्येक बँकेनें नोकरवर्गासाठीं एक डॉक्टर नेमला पाहिजे. प्रत्येक नोकरास आजारीपणांत हा डॉक्टर तपासून औषध देईल. औषधाचा खर्च बँक सोशील. अ दर्जाच्या बँकांनीं हा खर्च पूर्णपणें सोसावयाचा आहे. अ आणि ब दर्जाच्या बँकांनीं प्रत्येक नोकराचे बाबतींत किमान किती खर्च सोसावा, हें निवाड्यांत नमूद केलेलें आहे. पगाराप्रमाणें हा खर्च कमी अधिक आहे. उदाहरणार्थ मुंबईमधील क दर्जाच्या बँका १०० रुपये पगारवाल्या प्रत्येक नोकरासाठीं सालिना जास्तींत जास्त १५ रु. खर्च करतील. पुण्यामधील तत्सम नोकरावर क दर्जाच्या बँका जास्तींत जास्त १२ रु. खर्च करतील.

### निवाडा कोणास लागू आहे ?

१३ जून, १९४९ व २८ सप्टेंबर, १९४९ ह्या दिवशीं ज्या बँकांच्या शाखा एका पेक्षां जास्त प्रांतांत होत्या, अशांनाच निवाडा लागू आहे. महाराष्ट्रीय बँकांपुरतें पाहिलें, तर बँक ऑफ महाराष्ट्र आणि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया ह्यांवरच फक्त निवाडा बंधनकारक होईल. बाकीच्या बँकांवर निवाड्याप्रमाणें पगार, भत्ते, इत्यादी देण्याची जबाबदारी पडणार नाहीं. निवाड्यांतील अटी न पाळणें त्यांस किती काळ योग्य व शक्य होईल, हा प्रश्न अर्थातच स्वतंत्र आहे.

### पुण्यांतील बँक कारकुनास पगार किती मिळेल ?

पुणें शहरांतील बँक कारकुनास नोकरीच्या पहिल्या वर्षी किमान पगार ७३ रु. मिळेल, आणि महागाईभत्ता इंडेक्स नंबरांतील १० पॉइंटस वाढीस ८३/४ % ह्या हिशेबानें सुमारें २५ रु. होईल. म्हणजे, त्यास ७३ रु.+२५ रु. = ९८ रु. किमान मिळतील. त्याची नोकरी जितकीं वर्षे झाली असेल, त्या प्रमाणांत त्याला वेतनवाढ मिळेलच.

### त्यांची पगारवाढ कशी होईल ?

क दर्जाच्या बँकांत खालील प्रमाणें पगारवाढ होईल.

| बँकेची वर्गवारी | |
|---|---|
| १ | रु. ६८–५-११६–१५२-७ १६६–१८०-९-२२५-१०-२६५ / (६ वर्षे) (६ वर्षे) (२ वर्षे) (१ वर्षे) (५ वर्षे) (४ वर्षे) |
| २ | रु. ७३-५-१०३-६-१३९-$८\frac{१}{२}$-१५२-१६०-७-१९५-$७\frac{१}{२}$-२२५ / (६ वर्षे) (६ वर्षे) (२ वर्षे) (१ वर्षे) (५ वर्षे) (४ वर्षे) |
| ३ | रु. ६२-४-८६-५-११६-$५\frac{१}{२}$-१२७-१३५-६-१६५-$५\frac{१}{२}$-१९१ / ६ वर्षे (६ वर्षे) (२ वर्षे) (१ वर्षे) (५ वर्षे) (४ वर्षे) |


# NOTICE


## THE BANK OF AUNDH LIMITED.

Notice is hereby given that, an Extra Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Aundh, Limited, will be held at the Head Office of the Bank 111/112, Sadashiv Peth, Satara City, on Sunday the 17th September, 1950, at 4 P. M. (S. T.) to consider and adopt, if thought fit, the resolutions as special Resolutions for making the necessary amendments in the Memorandum of Association and Articles of Association of the Bank as per detailed notice sent to the Shareholders of the Bank separately.

SATARA, 1st August, 1950

By Order of the Board.
B. W. GHAMANDE,
Manager.

मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं. लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन:–२१७३८.

## आंतरराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत राष्ट्रीयीकरणाचें स्थान

### देशमुख समितीच्या शिफारशी

व्यापारी स्वरूपाच्या आयातनिर्यातीच्या सर्व गोष्टी सध्यां मध्यवर्ती सरकार हाताळीत असत. याचा सर्व कारभार पहिल्याप्रथम सरकार पुरस्कृत व्यापार संघटना ( स्टेट स्पॉन्सर्ड ट्रेडिंग कॉर्पोरेशन ) स्थापन करून त्याच्याकडे द्यावा अशी शिफारस राष्ट्रीय व्यापार समितीनें सरकारला सादर केलेल्या प्रतिवृत्तांत केलेली आहे. ही समिती सरकारनें १९४९ च्या ऑक्टोबरमध्यें स्थापन केली होती. डॉ. पंजाबराव देशमुख या समितीचे अध्यक्ष होते.

व्यापाराच्या कांहीं बाबतींत राष्ट्रीयीकरण हितकारक नसलें तरी कांहीं बाबतींत, विशेषत: आंतरराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत, तें करणें यथायोग्य ठरेल असें मत समितीनें एकमतानें संमत केलेल्या आपल्या प्रतिवृत्तांत दिलें आहे.

जेथें व्यापारावर सरकारी मालकी असण्याच्या बाजूनें सामान्यत: चांगलें मत नाहीं आणि आर्थिक धोरण खासगी उद्योगधंद्यांस वाव देण्याच्या दृष्टीनेंच आखलें जातें अशा अमेरिका, कानडा यांसारख्या देशांतही कांहीं मर्यादित प्रमाणांत व्यापारावर सरकारी मालकी असणें ही गोष्ट एकंदर आर्थिक धोरणांत बसत नाहीं असें मानीत नाहींत ही गोष्ट समितीनें निर्देशिली आहे. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें एकूण आयातीच्या ५० टक्के आयात सरकार पुरस्कृत संस्थामार्फत होते.

### ट्रेडिंग कॉर्पोरेशनचें स्वरूप

समितीनें शिफारस केलेलें ट्रेडिंग कॉर्पोरेशन एका कायद्यान्वयें स्थापन व्हावें असें म्हटलें आहे. त्याचें अधिकृत भांडवल १० कोटी रुपये असावें, पण सुरवातीस तें २ कोटी ठेवावें. या भांडवलपैकीं कमींत कमी ५१ टक्के भांडवल मध्यवर्ती सरकारनें घालावें व बाकीचें राज्य सरकारें व खाजगी धंदेवाल्यांना भरणा करूं द्यावें. मध्यवर्ती सरकारनें भांडवलाची व कमींत कमी नफ्याची खासगी भागीदारांना हमी द्यावी. इतर सर्वसामान्य व्यापारी संस्थांप्रमाणेंच हें कॉर्पोरेशन सर्व करांस पात्र असावें. त्याचा सर्व कारभार संपूर्ण व्यापारी तत्त्वावर चालावा आणि दैनंदिन कारभार पहाण्यासाठी निर्विवाद सचोटीच्या उद्योगपतींचें बनलेलें एक कार्यकारी मंडळ आणि त्याच्या नियंत्रणाखाली काम करणारा एक कार्यसंचालक नेमावा. पहिलें मंडळ व त्याचे अध्यक्ष सरकारनें नेमावेत.

### कॉर्पोरेशनचें कार्य

या कॉर्पोरेशनच्या कामकाजाबाबत समितीनें पुढील प्रमुख शिफारशी केल्या आहेत:—

( अ ) अन्नधान्य, पोलाद, पूर्व आफ्रिकेंतील कापूस आणि सरकारनें केलेल्या देवघेवीच्या स्वरूपाच्या करारांमुळें करावे लागणारे व्यवहार या सर्व व्यापारी हालचाली कॉर्पोरेशननें भागत सरकारकडून आपल्या हातीं घ्याव्यात.

( आ ) कोळसा व आखूड धाग्याचा कापूस यांच्या निर्यातीचा मक्ता कॉर्पोरेशनला द्यावा.

( इ ) ग्रामोद्योगांच्या वस्तूंचा निर्यात व्यापार या कॉर्पोरेशननें स्वत:कडे घ्यावा. कारण, सुरवातीला खासगी धंदेवाल्यांना तें फायदेशीर पडणार नाहीं. ग्रामोद्योगाच्या वस्तूंना परदेशांत योग्य तेवढी बाजारपेठ निर्माण झाली कीं, कॉर्पोरेशननें या क्षेत्रांतील आपला कारभार कमी करावा व खासगी धंदेवाल्यांना उत्तेजन द्यावें.

( ई ) राष्ट्रीय महत्त्वाच्या एखाद्या वस्तूचा सरकारमार्फत व्यापार करावा किंवा चालू असल्यास बंद करावा याबाबत कार्पोरेशननें सरकारला वेळोवेळीं सल्ला द्यावा. मात्र सरकारच्या पूर्व संमतीवाचून कोणत्याही वस्तूबाबत आपलें व्यापारक्षेत्र वाढविण्याची कॉर्पोरेशनला मुभा नसावी.

( उ ) भारतीय बाजारपेठेंत परकी सरकारमार्फत खरेदी किंवा विक्री करण्याचे बाबतींत कॉर्पोरेशन अवश्य तेव्हां प्रमुख म्हणून वा प्रतिनिधी म्हणून काम करूं शकेल.

( ऊ ) भारतीय व्यापाऱ्यांच्या विनंतीवरून त्यांच्या वतीनें आणि त्यांच्या जबाबदारीवर परदेशांतील व्यापाऱ्यांशीं वाटाघाटी करूं शकेल.

### आवश्यक वस्तू

कांहीं आवश्यक वस्तूंच्या आयात–निर्यात व्यापाराबाबत समितीनें आपलीं मतें पुढीलप्रमाणें मांडलीं आहेत.

कच्चा ताग–भारतीय ताग गिरणी संघानें केंद्रित खरेदीची पद्धति अवलंबवावी.

अलोहित (नॉन-फेरस) धातू–या बाबतींत सरकारतर्फे व्यापार करण्याच्या प्रश्नाच्या योग्यायोग्यतेचा कॉर्पोरेशननें विचार करावा.

तागमाल, शेलॅक, मॅंगनीज–कॉर्पोरेशनला कांहीसा अनुभव मिळाल्यानंतर याबाबतींतील व्यापार हातीं घ्यावा किंवा नाहीं या प्रश्नाचा विचार करावा.

चहा व अभ्रक—याबाबतींत सध्यांचा व्यापार हातीं घेऊं नये.

कोळसा—सरकारमार्फत चालणारा याचा व्यापार तसाच चालू ठेवावा.

साखर—अंतर्गत उत्पादन जादा सांठा राहील इतकें वाढेपर्यंत याबाबतींत प्रश्नच उद्भवत नाहीं.

सरकारमार्फत चालणाऱ्या या व्यापाराचे बाबतींत देशांतील बँका, नौकानयन संस्था व विमा संस्था यांचा उपयोग करून घेण्यावर समितीनें बराच भर दिला आहे. अंतर्गत व्यापाराचीही सहकारी धर्तीवर पुनर्रचना करण्याची सूचना समितीनें केलेली आहे. देशांतील बँका, नौकानयन संस्था व विमासंस्था यांचा देशाचा व्यापार वाढविण्याचे बाबतींत योग्य उपयोग करून घेतल्यास व्यापाराखेरीज इतर क्षेत्रांतही आपलें आर्थिक धोरण यशस्वी करण्यांत सरकारला फार मोठी मदत होईल. तसेंच अंतर्गत व्यापाराची सहकारी तत्वावर पद्धतशीर पुनर्रचना केल्यानें कॉर्पोरेशनचा कारभार आणखी वाढविण्याची गरज भासणार नाहीं, असें समितीला वाटतें; कारण सहकारी संस्थांमुळें सरकारी मालकीच्या व्यापार–व्यवस्थेंतील सर्व लाभ मिळतोच, पण खासगी उद्योगधंद्यालाही वाव मिळतो. आयात वस्तूंच्या वाटपाचें नियमन, प्रत्येक राज्यांत कॉर्पोरेशनशीं प्रत्यक्ष संबंध असलेलें एक मध्यवर्ती भांडार व त्याच्याशीं संलग्न असणारें सहकारी संस्थांचें जाळें तयार करून यशस्वीपणें करतां येईल असें समितीला वाटतें.

### आयात नियंत्रण धोरण

या खेरीज समितीनें सरकारचें आयात नियंत्रण धोरण व त्याची पद्धति यांत एकसूत्रता आणण्याची शिफारस केली आहे. समितीनें असेंही मत व्यक्त केलें आहे कीं, एखाद्या विवक्षित वस्तूच्या बाबतींत बाजारांत सुरळीत परिस्थिति निर्माण होण्याचे दृष्टीनें योजिलेल्या सढळ हातानें परवाने देण्याच्या हंगामी कालावधीनंतरच ती वस्तू सर्वसाधारण खुल्या परवान्याखालीं ठेवण्याचें धारण सरकारनें ठेवलें तर आयातीबाबतची वायदेबाजी बऱ्याचशा प्रमाणांत कमी होऊं शकेल.

## धी सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी लिमिटेड, मुंबई.

### काटकसर, मर्यादित खर्च व सावधगिरीनें गुंतवणूक

वरील कंपनीची सहावी वार्षिक सभा कंपनीच्या मुख्य कचेरींत तारीख २७–७–१९५० रोजीं कंपनीचे चेअरमन श्री. शांतिलाल शहा यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सदर सभेंत कंपनीचा १९४९ सालचा अहवाल व हिशेबाचे तक्ते मंजूर करण्यांत आले.

कंपनीनें नवीन काम मिळविण्याचे बाबतींत जरी विशेष प्रगति केलेली नसली तरी तें काम अगदीं थोड्या खर्चांत मिळवून खर्चाचें प्रमाण आपल्या नेहमीच्या मर्यादेंत ठेवलें आहे, हेंच या कंपनीचें खरोखर वैशिष्ट्य म्हणतां येईल. असेर हेंच धोरण कंपनीचे व विमेदारांचेही हिताचे दृष्टीनें फायदेशीर ठरणारें आहे, यांत संशय नाहीं. या काटकसरीचे धोरणामुळेंच कंपनीला आपला लाईफ फंड अहवालाचे सालीं रु.२,६७,००० हून रु.३,४८,००० चे वर नेतां आलेला आहे. कंपनीच्या लाइफ फंडापैकीं मोठा हिस्सा कंपनीनें सहकारी रोख्यांतच गुंतविला आहे. कंपनीच्या विस्ताराकडे पाहतां एजंटांकडून येणें असलेल्या रकमेचा आंकडा अगदींच किरकोळ आहे. कंपनीच्या सरळ व चोख व्यवहाराची यावरून खात्री पटण्यासारखी आहे. तसेंच पैसे गुंतविण्याच्या कंपनीच्या सध्यांच्या सावधगिरीच्या धोरणामुळें; दुरुस्त विमा कायद्यांतील बंधनांचा या कंपनीवर कांहींही दुष्परिणाम होण्यासारखा नाहीं, ही गोष्ट उघड आहे.

गेल्या वर्षांत कंपनीकडे फक्त ५,००० रुपयांच्या क्लेम्सची नोंद आली. त्या वर्षी एकूण ८००० रु. चे क्लेम्स चुकते केले व आता अवघे ११,००० रु. चे क्लेम्स द्यावयाचे आहेत. कंपनी याबाबतींत दाखवींत असलेली तत्परता वाखाणण्यासारखी आहे. चेअरमन श्री.शांतिलाल शहा यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हटल्याप्रमाणें बरेच लोक पॉलिसीचें बेचन पत्र वेळींच करून ठेवींत नाहींत व मग वारसा सर्टिफिकेट मिळविण्यांत वेळेचा व पैशाचा व्यय होतो. याबाबतींत विमेदारांनीं जरूर ती व्यवस्था आगाऊ करून ठेवणें त्यांच्याच हिताचें आहे.

कंपनीच्या संचालक मंडळावर अनेक निरनिराळ्या धंद्यांत वावरणारी नामवंत मंडळी असून अध्यक्षपदीं कामगार क्षेत्रांत परिचित असलेले मुंबईचे प्रसिद्ध सॉलिसिटर व लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे उपाध्यक्ष श्री शांतिलाल शहा यांची निवड झाली आहे. कंपनीवरील लोकांचा विश्वास वृद्धिंगत होण्यास या सर्वांची मदत झाल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच, कंपनीचा कारभार विमाव्यवसायांतील मुरब्बी असे श्री. शंकरराव आगाशे यांच्याकडे असल्यामुळें कंपनीच्या चोख व्यवस्थेबद्दलही सर्वांची खात्री होईल. कंपनीच्या या यशस्वी मार्गदर्शनाबद्दल आम्ही संचालकवर्गाचें मनःपूर्वक अभिनंदन करून कंपनीस उत्तरोत्तर अधिकाधिक यश लाभो असें इच्छितों.

---

**सीलोन आणि जागतिक बँक**—वर्ल्ड बँकेचे आणि इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचे सभासद करून घेण्यासंबंधीं सीलोनला वरील दोन संस्थांकडून मंजुरी मिळाल्याचें समजतें. ह्या संस्थांची कायदेशीर वर्गणी भरण्यासाठीं सीलोनचे फडणीस लवकरच एक बिल सीलोनच्या विधिमंडळापुढें आणणार आहेत. त्यानंतर येत्या सप्टेंबर अखेर लंडनला भरणाऱ्या "आग्नेय आशिया मदत परिषदे"ला सीलोनचा प्रतिनिधी हजर रहाणार आहे.

---

## आभारप्रदर्शन

संपादक "अर्थ"

यांस सप्रेम सा. न. वि. वि. आपण ता. १२।२।४७ चे 'अर्था' मध्ये "महाराष्ट्रांतील मोठे उद्योगधंदे" या मी लिहीत असलेल्या प्रबंधाविषयीं एक स्फुट लिहून या पहाणीस मदत करावी असें लिहिलें होतें. कळविण्यांस अत्यंत आनंद होतो की, हा प्रबंध मुंबई विश्वविद्यालयानें एम. ए. करतां संमत केला आहे व मी या पदवीस पात्र झालों आहें. तरी महाराष्ट्रांतील निरनिराळ्या कारखानदारांनीं आमचे प्रश्नपत्रिकेस जीं उत्तरें पाठवलीं त्यांचा हा प्रबंध लिहिताना फार उपयोग झाला. त्या सर्व कारखानदारांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

आपला,

शिवाजी पार्क, मुंबई ता २-८-१९५०

व. पां. पेंडसे
बी.ए.(ऑनर्स) बी. कॉम. सर्टि. ए. आय. आय. बी.

---


पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असे फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

---

**बचत व व्याज**

आपल्याजवळ असलेल्या पैशावर जास्तींत जास्त व्याज मिळावें असें प्रत्येकाला वाटतें.

**बँक ऑफ पूना लि.**

(शेड्यूल्ड बँक)

वसूल भांडवल १२,५०,०००

ठेवींचे दर:—

| | | |
|---|---|---|
| चालु खाते | १/२ | टक्का |
| सेव्हिंग्ज बँक | १॥ | " |
| मुदत ठेव १ वर्ष | २॥ | टक्के |
| " ३ | ३ | " |

जास्त मुदतीच्या ठेवींवरील व्याजाबद्दल चौकशी करावी.

मुख्य ऑफीस व सांगली शाखेंत लॉकर्स भाड्यानें मिळतील.

पत्ताः- ४५५ रविवार पुणें.

गो. गं. साठे, मॅनेजर

## चलनवाढ व नियंत्रणें ह्यांचा अवलंब ?

### कोरियांतील युद्ध आणि अमेरिकन अर्थव्यवस्था

कोरियांतील युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकन अर्थव्यवस्थेपुढें एक नवा प्रश्न उपस्थित झाला आहे. गेल्या महायुद्धामुळें इतर देशांप्रमाणेंच अमेरिकेंतही चलनवाढ झाली. अमेरिकेची उत्पादनक्षमताच जबर असल्यामुळें ह्या चलनवाढीचें प्रमाण फार जाणवलें नाहीं इतकेंच; कोरिअन युद्ध सुरू झाल्यापासून चलनवाढ आणि वाढत्या किंमती हे दोन परस्परसंबंधित प्रश्न नव्यानें डोकें वर काढूं पहात आहेत. प्रे. ट्रुमन आणि इतर अमेरिकन पुढारी ह्यांनीं जनतेला स्वार्थी प्रवृत्तिविरुद्ध आणि घाबरटपणाविरुद्ध इषारे दिले आहेत. परंतु ह्या इशाऱ्यांचा फारसा उपयोग झाल्याचें दिसत नाहीं.

युद्ध सुरू झाल्याबरोबर अन्न विकत घेण्यासाठीं नागरिकांची एकच गडबड उडाली. वास्तविक अमेरिकेंत अन्नधान्याचा अगर इतर अन्नाचा तुटवडा नाहीं. तुटवडा नाहीं हें लक्षांत आल्यावर ग्राहकांची गर्दी कमी होईल असा अंदाज आहे. अमेरिकेचें शेतकी खातें अन्नविषयक माहिती देणारीं वार्तापत्रें मुद्दाम प्रसिद्ध करीत आहे. अन्नविषयक वस्तू सोडल्या तर इतर वस्तूबद्दल मात्र परिस्थिति वेगळी आहे. ह्या वस्तूंचा खरोखरच तुटवडा आहे. नागरिकांची मागणी आणि लष्कराची मागणी ह्यांच्यांत स्पर्धा उत्पन्न झाली आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणें आणि टेलिव्हिजनचे सेट्स ह्या दोन्हीं वस्तूंच्या मागण्या एकदम पऱ्या करता येणें अमेरिकन कारखान्यांना शक्य होणार नाहीं. सरकारनें ५० कोटी डॉलर्सच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या मागण्या नोंदल्या आहेत. त्यामुळें टेलिव्हिजनच्या सेट्सचें उत्पादन साहाजिकच कमी होणार आहे. कोरियांतील युद्ध चालू होण्यापूर्वी ह्या वस्तूंचा बाजार तेजींत होता.

युद्धच सुरू झाल्यावर शस्त्रास्त्रें, विमानें, बोटी ह्यांची गरज भासणार आणि त्या प्रमाणांत घरें, मोटारी, प्रपंचाला लागणाऱ्या बारीकसारीक वस्तू ह्यांचें उत्पादन कमी होऊन टंचाई वाढणार. अमेरिकन सरकारनें अजून टंचाई असलेल्या वस्तूंचें वाटप सुरू केलेलें नाहीं. शक्यतोंवर विक्रेत्यांच्या आणि ग्राहकांच्या सहकार्यानेंच युद्धाच्या प्रयत्नांत मदत मिळविण्याचें सरकारचें धोरण आहे. अमेरिकन अर्थ-व्यवस्था जगांत शांतता नांदेल ह्या भरंवशानें नागरिकांच्या शांतताकालीन गरजा भागविण्याचा प्रयत्न नुकताच करूं लागली होती. अशा वेळीं एकाएकीं युद्धाच्या खर्चाचा बोजा तिच्यावर पडल्यामुळें चरितार्थाच्या वस्तूंची चणचण भासणें साहाजिकच आहे. ह्याचा अर्थ अमेरिकन नागरिकाला अगदी पोटालाच कमी पडेल असा नव्हे; परंतु कांहीं कांहीं बाबतींत त्याला स्वार्थत्याग करावाच लागेल. वस्तूंची टंचाई पडूं दिल्यामुळें त्यांच्या किंमती वाढविण्यांत येऊन मागणी-पुरवठ्याचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत आला तर युद्धाच्या खर्चाचा बोजा अमेरिकन कामगारांच्या खांद्यावर पडल्याशिवाय राहणार नाहीं. असें होऊं न देण्याचें धोरण प्रे. ट्रुमन ह्यांनीं आधिच जाहीर केलें आहे. ह्याचा सरळ अर्थ असा कीं, प्रे. ट्रुमन ह्यांच्यापुढें दोन अप्रिय मार्ग आहेत. चलनवाढ अगर नियंत्रणें हेच ते दोन मार्ग. दोन्हींपैकीं कोठलाहि मार्ग स्वीकारला तरी त्यामुळें राजकीय असंतोष उत्पन्न होणार ह्यांत मात्र शंका नाहीं.

---

## १९४८ मध्यें बुडालेल्या हिंदी जॉइंट स्टॉक बँका

| प्रांत किंवा संस्थान | बँकांची संख्या | भांडवल | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिकृत (रु.) | खपलेलें (रु.) | वसूल (रु.) |
| प. बंगाल | १८ | २,७३,२५,००० | ५२,५८,५८० | २९,४८,४३२ |
| मद्रास | ३ | ६,००,००० | २,००,३८८ | १,३७,२०३ |
| मुंबई | २ | ३०,००,००० | ३०,००,००० | १९,७९,५८० |
| पू. पंजाब | ५ | १,८०,००,००० | २२,७३,४०० | १२,१२,७६८ |
| आसाम | ३ | २,५१,००,००० | १०,०६,७३० | १,०१,१९० |
| ओरिसा | १ | २५,००,००० | ४९,९५० | ४२,७१२ |
| बिहार | १ | ६,००,००० | ४०० | — |
| उ. प्रदेश | २ | ५१,००,००० | १०,१७,८१० | ५,०२,७३७ |
| त्रावणकोर | १ | १९,००० | १३,५४० | १३,३४२ |
| म्हैसूर | १ | १,००,००० | २८,१५० | २८,१५० |
| कोचीन | १ | २०,००० | ४,४०० | २,०५० |
| ग्वालेर | १ | ४,००,००,००० | १,००,००,००० | १,००,००,००० |
| एकुण | ३९ | १२,२३,६४,००० | २,२८,५३,३४८ | १,६९,६८,१६४ |

१९३९ पासूनचे बुडालेल्या बँकाचे आकडे पाहिले, तर १९४० सालीं सर्वांत ज्यास्त म्हणजे १०५ बँका बुडाल्या. तरी सुद्धां त्या सर्वांचें मिळून अधिकृत भांडवल ६,२८,३५,००० रु., खपलेले भांडवल २३,०१,५८३ रु. व वसूल भांडवल १२,०१,४४० रु. होतें. १९३९ सालीं ९४ बँका बुडाल्या होत्या, त्यांचें अधिकृत खपलेलें व वसूल भांडवल अनुक्रमें १,८८,८०,००० रु., २९,१०,४०१ रु. व ११,३४,२७७ रु. होतें. १९४१ सालीं ७९, १९४२ सालीं ४९, १९४३ सालीं ५३, १९४४ सालीं २५, १९४५ सालीं ३०, १९४६ सालीं २८ व १९४७ सालीं ३२ बँका बुडाल्या होत्या. १९४८ सालीं त्या मानानें कमी बँका बुडूनहि यांतील समाविष्ट भांडवल इतर कोणत्याहि वर्षांपेक्षां अधिक आहे.

## संतति म्हणजे औरस संतति

**इन्कमटॅक्स कायद्याचा प्रश्न: मद्रास हायकोर्टाचा अभिप्राय**

राजसुंदरम् चेट्टी अँड सन्स ह्या भागीदारीच्या फर्ममध्यें राजसुंदरम् ह्यांचे बरोबर त्यांचे दोघे मुलगेहि भागीदार होते. त्यापैकीं कल्याणसुंदरम् हा औरस व त्यागराजन् हा अनौरस मुलगा होता. भागिदारीची फर्म इन्कम टॅक्स कायद्याच्या २६ अ कलमाप्रमाणें नोंदलेली होती. मार्च १९४५ अखेरच्या हिशोबाच्या वर्षी भागीच्या नफ्यापैकीं ३०८ रु. कल्याणसुंदरम्च्या नांवानें आणि ७,२३६ रु. त्यागराजन्च्या नांवानें जमा करण्यांत आले. १९४५–४६ च्या हिशोबांत इन्कम टॅक्स अधिकाऱ्यानें कायद्याच्या १६ (३) (अ) (ii) कलमान्वयें ह्या रकमा राजसुंदरम् चेट्टीच्या, म्हणजे मुलांच्या बापाच्या, एकूण प्राप्तींत मिळवल्या. कल्याणसुंदरम्च्या वाट्याचे ३०८ रु. स्वत:च्या प्राप्तींत धरण्यास राजसुंदरम् चेट्टीचा विरोध नव्हता, परंतु त्यागराजन्च्या वाट्याचे ७,२३६ रु. मात्र स्वत:च्या प्राप्तींत धरण्यास तो तयार नव्हता. १६ (३) (अ) ह्या कलमांत 'मूल' हा शब्द आहे, त्यांत अनौरस मूलहि समाविष्ट आहे, असें इन्कमटॅक्स अधिकाऱ्याचें म्हणणें होतें. परंतु अपेलेट ट्रायब्यूनलनें हें मत मान्य केलें नाहीं, व त्यानें राजसुंदरम् चेट्टीच्या म्हणण्यास दुजोरा देऊन त्याच्या एकूण प्राप्तींत दाखल केलेले ७,२३६ रु. वजा करावयास लाविले. कायद्याप्रमाणें, 'मूल' म्हणजे 'औरस मूल' च होय; ह्या खेरीज दुसरा अर्थ हवा असेल, तर त्याप्रमाणें विशिष्ट कायद्यांत तसा स्पष्ट खुलासा पाहिजे; इन्कम टॅक्स कायद्यांत तसा खुलासा नसल्याकारणानें "मूल" ह्या शब्दाचा स्वाभाविक अर्थच घेतला पाहिजे; अनौरस संतती कायदा धरून चालत नाहीं, म्हणून मूल ह्याचा अर्थ औरस मूल असाच धरला पाहिजे, दुसरा अर्थ हवा असेल तर त्याचा स्पष्ट उल्लेख जरूर आहे, असा अभिप्राय मद्रास हायकोर्टानें व्यक्त केला.


---

**निर्भेळ दूध मिळण्याबाबत**—संयुक्तप्रांत सरकारनें सर्व मोठ्या शहरांतून दूध समित्या स्थापन करण्याचा विचार चालविला आहे. ह्या समित्यांवर दुधाचे व्यापारी, ग्राहक आणि नगरपालिकेचे प्रतिनिधी काम करतील. दुधाचें उत्पादन, वांटप व किंमत ह्या संबंधीं सरकारला सल्ला देण्याचें काम समित्या करणार आहेत. हळुहळु ह्या समित्यांना अधिक विस्तृत अंमलबजावणीचे अधिकार देण्यांत येणार आहेत असें समजतें.

**रशियांतील कापसाचें उत्पादन**—रशिआंतील युक्रेन व मोल्डाव्हिआ ह्या भागांत ह्या वर्षी कापसाचें भरपूर उत्पादन होणार आहे. जगांतील सर्वांत उत्तरेकडील भागांत कापूस पिकविणारा एवढाच प्रदेश आहे असें म्हणतात. ह्या प्रदेशाला कालव्याचें पाणी नसतांना सुद्धां यांत्रिकीकरणामुळें कापसाच्या पिकाची वाढ झाली असें समजतें.

**सोव्हिएट रशिआची प्रगति**—ब्रिटनचे संरक्षणमंत्रि मि. शिनवेल ह्यांनीं रशिआच्या लष्करी सामर्थ्याची कल्पना देतांना, रशिआजवळ, १७५ लढ्या तुकड्या, २५,००० रणगाडे आणि १९,००० विमानें असावींत असा अंदाज केला होता. रशिआच्या युद्धोत्तर प्रगतिविषयीं लिहितांना लंडन टाइम्सनें ही प्रगति लक्षांत भरण्यासारखी आहे असें मत प्रगट केलें आहे. टाइम्स पुढें म्हणतो कीं, मूलभूत उद्योगधंदे उभारतांना रशिआंतील लोकांचें रहाणीचें मान मुद्दामच बेतानें ठेवण्यांत आलें होतें; परंतु आता बहुतेक लोकांचें रहाणीचें मान उंचावत चाललें आहे.


बेडेकर पापड





'अर्थ' ग्रन्थमाला.


१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १–८–० | रु. १–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | १–०–० |
| चालू डिपॉझिट | ” | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.